| MHKO070017032023 | **<u>रे.क.नं.१५४/२०२३</u>**<br>**बापू भरमू चौगुले**<br>**विरुध्द**<br>**सतिश बाळू चौगुले आणि इतर** |
|---|---|

**<u>नि.क्र.२५ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादीने सी.पी.सी.चे ऑर्डर ६ रूल १७ प्रमाणे दावा दुरूस्ती कामी दाखल केला आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात कथन केले आहे की, सदर कामी नजरचुकीने व टायपिंग मिस्टेकनी यातील प्रतिवादी क्र.६ यांचे नाव तेजश्री सुकुमार चौगुले असे टाईप झालेले असुन सदर प्रतिवादी यांचे रेकॉर्डवरील नाव सुजाता सुकुमार चौगुले असे आहे. तेजश्री हे नाव त्यांचे माहेरचे प्रचलित असलेने तसे नमुद केले गेले आहे. त्यांना सरनामेत दिलेल्या पत्यावर नोटीसा काढल्या असता त्या लागू झाल्या नाहीत. त्याबाबत वादीने चौकशी केली असता नावातील फरक लक्षात आला. वास्तविक तेजश्री सुकुमार चौगुले व सुजाता सुकुमार चौगुले या दोन्ही नावाची एकच व्यक्ती आहे व सुजाता हे त्यांचे सासरकडील नाव आहे. त्यामुळे त्यांनी त्या अनुषंगाने अर्ज मंजुर करण्याची मागणी केली आहे.

३. विरुध्द बाजुने त्यांचे म्हणणे वकीलांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागेच नोंदवुन कथन केले आहे की, सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असल्याने तो नामंजुर करण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे त्यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला. युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे मागितलेली सुचित दुरुस्ती मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...होय |
| २. | काय आदेश ? | ...अंतिम आदेशान्वये |

## का र ण मि मां सा

**मुद्या क्र. १ करिता**

**५.** वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरुध्द वाटप, कब्जा व मनाईसाठी दाखल केलेला आहे. ***स्टेट ऑफ आंध्रप्रदेश आणि इतर वि. मे. पायोनियर बिल्डर्स आंध्रप्रदेश, ए.आय.आर.२००७-एस.सी.११३*** या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वाद कथनामध्ये उदारपणे दुरुस्ती करण्याचा मुख्य उद्देश हा निरनिराळे दावे टाळणे असल्याचे मत नोंदवलेले आहे.

**६.** वादीची प्रस्तावित दुरुस्तीची मागणी मान्य केल्यास प्रतिवादींना अडचणीचे ठरणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींना काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी हे कुठल्याही प्रकारे नविन केस मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख-या वादाच्या मुद्दयावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या निष्कर्षापर्यंत मी येत आहे. सदर अर्जावर खर्च लावल्यास त्याचा उद्देश सफल होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा सारासार विचार करता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज रक्कम रु.१००/- खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादीने सदर खर्च हा पुढील तारखेपर्यंत आव्हानित प्रतिवादींना दयावा.

३. वादीने प्रस्तावित दुरुस्ती खर्च दिल्यानंतर करावी.

४. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.10.06 17:15:17 +0530

**(अ. त्रिं. मनगिरे)**

दिनांक ०६/१०/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 06/10/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 06/10/2025. |
| Judgment/order uploaded on | 06/10/2025. |